RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : २०३ वा | सोमवार दि २९ सप्टेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

रेकॉर्डब्रेक कामगिरी करणाऱ्या नेत्यावर भाजपकडून मोठी जबाबदारी; शिंदे पॅटर्न राबवण्याची तयारी?

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

हरयाणा, दिल्ली, महाराष्ट्र जिंकल्यानंतर आता भारतीय जनता पक्षानं बिहारवर लक्ष केंद्रीत केलं आहे. बिहारमध्ये सत्ता राखण्यासाठी भाजपनं पूर्ण ताकद पणाला लावली आहे. बिहारमध्ये भाजपला अद्याप स्वत:चा मुख्यमंत्री करता आलेला नाही. वर्षाच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. त्याची जबाबदारी भाजपनं केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे जबाबदारी सोपवली आहे. बिहारचं प्रभारीपद त्यांच्याकडे देण्यात आलं आहे. बिहार विधानसभेची निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर आलेली असताना भाजपनं धर्मेंद्र प्रधान यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. संघटनेतला माणूस अशी त्यांची ओळख आहे. प्रभारी पदाची जबाबदारी मिळताच प्रधान यांनी दुसऱ्याच दिवशी जनसंपर्क अभियान सुरु केलं. राजधानीतील सगळ्यात अवघड मतदार असलेल्या दिघा विधानसभा मतदारसंघातूनच त्यांनी अभियान हाती घेतलं. पटना साहिब, कुम्हरार आणि बांकीपूर यांच्या तुलनेत दिघा मतदारसंघ आव्हानात्मक मानला जातो. भाजप चे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे बिहार विधानसभा निवडणुकीची जबाबदारी देण्यात आलेली आहे. यामागे त्यांनी आतापर्यंत केलेली शानदार कामगिरी आहे. प्रधान २०१० मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीचे सहप्रभारी होते. त्यावेळी एनडीएनं २४३ पैकी २०६ जागा भाजप प्रणित एनडीएनं मिळवल्या होत्या. हा विजय ऐतिहासिक होता. बिहार विधानसभा निवडणुकीत असा विजय अद्याप कोणालाच मिळालेला नाही. त्यामुळे प्रधान यांच्या नावावर रेकॉर्डब्रेक कामगिरीची नोंद आहे. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीवेळी प्रधान यांच्याकडे बिहारचा प्रभार होता. त्यावेळी त्यांनी भाजपला ४० पैकी ३१ जागा जिंकून दिल्या. हा विजय प्रचंड मोठा होता. कारण त्यावेळी नितीश कुमार एनडीएमध्ये नव्हते.

बिहारमध्ये भाजपनं शिंदे पॅटर्न राबवण्याची तयारी केलेली आहे. २०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपनं ७३ तर, नितीश कुमारांच्या जेडीयूनं ४३ जागा जिंकल्या. पण आधी ठरल्याप्रमाणे भाजपनं नितीश यांना मुख्यमंत्रिपद दिलं. यानंतर नितीश यांनी भाजपची साथ सोडत महागठबंधन सोबत हातमिळवणी केली आणि पुन्हा मुख्यमंत्री झाले. पण लोकसभा निवडणूक २०२४ आधी नितीश पुन्हा एनडीएमध्ये परतले आणि मुख्यमंत्री झाले. सत्तेचं गणित सोडवायचं असल्यानं भाजपकडे पर्याय नव्हता. आता प्रधान यांनी बिहारमध्ये भाजपला दणदणीत विजय मिळवून दिल्यास, भाजपला बहुमताच्या जवळ नेल्यास महाशक्तीला शिंदे पॅटर्न राबवता येईल. नितीश यांच्यावरील अवलंबित्व कमी झाल्यास भाजपला महाराष्ट्राप्रमाणे मुख्यमंत्री पद खेचून घेता येईल.

एलसीबीचा कारवाईचा दंडूका! सात बेकायदेशीर बायोडिझेल व्यवसायिकांवर गुन्हे दाखल!

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीच्या पथकाने जिल्ह्यात छापा मारून अवैधरित्या बायोडीजल विक्री करणाऱ्या सात व्यवसायिकांवर कारवाईचा बळगा उगारला आहे. त्यांच्याकडून एकूण ३२०० लिटर बायोडिझेलसह पाच लाख ८६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये अवैधरित्या चालविण्यात येणाऱ्या बायोडीजल व्यावसायीकांवर कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांनी अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक करुन, जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गा लगत अवैधरित्या चालविण्यात येणाऱ्या बायोडीजल व्यावसायीकांची गोपनीय माहिती काढली. दरम्यान मलकापुर शहर व पोलिस स्टेशन एमआयडीसी दसरखेड हद्दीत स्थागुशाच्या पथकाने मिळालेल्या गोपनिय माहिती वरुन २७ सप्टेंबर रोजी या क्षेत्रातील अवैध बायोडीजल विक्री करणाऱ्या व्यवसायीकांवर धडक कारवाई केली. मलकापुर शहर हददीत धरणगांव शिवारातील हॉटेल फौजी धाब्याच्या बाजुला अवैध बायोडिझेलचा साठा जमीनीमध्ये पुरलेल्या लोखंडी टाक्यामध्ये केलेला होता. तहसीलदार यांच्यासह पथकाने सदर ठिकाणी छापा टाकुन आरोपी सय्यद अब्दुला सय्यद याकुब (वय ३७) वर्षे रा. पारपेठ, ता.मलकापुर, यास ताब्यात घेवून या ठिकाणावरुन १२०० लिटर बायोडिझेल व इतर साहित्य असा एकूण २,६४,७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.तसेच दसरखेड,एमआयडीसी हददीत रनथम शिवारातील हॉटेल एकता समोर अवैध बायोडिझेलचा साठा जमीनीमध्ये पुरलेल्या लोखंडी टाक्यामध्ये केलेला असून फायद्यासाठी विक्री करीत असल्याने पथकाने छापा टाकुन आरोपी इम्रान खान फिरोज खान (वय २०) रा. बेरजाली मैदपुर जि.उज्जैन, मध्यप्रदेश याला ताब्यात घेवुन २००० लिटर बायो डिझेल व इतर साहित्य असा एकूण ३,२२,००० रुपयांचा मुद्देमाल मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. आरोपी लखन पांचाळ, रा. जमुनीया शंकर रतलाम, मध्यप्रदेश, शाकीर खान मास्टर रा.मैदपुर जि.उज्जैन, मध्यप्रदेश, मो. नईम शेख रा. मेहरुन जळगांव, अरशद तेली रा. गुजरात, यांचे विरुध्द पोलीस स्टेशन दसरखेड, एमआयडीसी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दोन्ही गुन्ह्यातील एकुण ३२०० लीटर बायोडिझेल व साहित्य असा एकुण ५,८६,७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अमेरिकी शुल्काचा कडू घोट

संपादकीय लेख

जगातील वेगवेगळ्या देशांवर आयातशुल्काचे हत्यार उगारणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची वक्रदृष्टी आता औषधांकडे वळली असून, अमेरिकेत आयात होणाऱ्या औषधांवर त्यांनी शंभर टक्के आयातशुल्क लागू केले आहे. भारत आणि युरोपीय देशांमधील औषध कंपन्यांना त्याचा फटका बसण्याचा संभव आहे. येत्या एक ऑक्टोबरपासून आयात होणाऱ्या ङ्कब्रँडेडफ आणि ङ्कपेटंटेडफऔषधांवर हे शुल्क लागू करण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे; तसेच ङ्कजेनेरिकफ औषधांना आणि अमेरिकेत या औषधांचे उत्पादन केल्यास हे शुल्क लागू होणार नाही, असाही त्यांचा पवित्रा आहे. गेल्या काही काळात ङ्कजगाचा दवाखानाफ म्हणून उदयास येत असलेल्या भारतावर आणि भारतीय औषध कंपन्यांवर त्याचे काय परिणाम होऊ शकतात, याबाबत तज्ज्ञांमध्ये वेगवेगळी मते आहेत. डॉ. रेड्डीज, सिप्ला, सन फार्मा, ल्युपिन, झायडस लाइफ, अरविंद फार्मा, बायोकॉन आणि ग्लेनमार्क अशा कंपन्यांचा अमेरिकेतील औषधनिर्यातीत मोठा वाटा असल्याने आयातशुल्क लागू झाल्यावर अनेकांचे समभाग कोसळले. मात्र, काही भारतीय कंपन्यांचे अमेरिकेतही कारखाने असल्यामुळे ट्रम्प यांच्या अटींचा त्यांना नेमका किती फटका बसेल, हे अद्याप स्पष्ट नाही. प्रामुख्याने जीवरक्षक औषधे, कर्करोग, गर्भनिरोधक औषधे , उच्च रक्तदाब आणि नैराश्यावरील औषधांचा भारतातून पुरवठा होतो. त्यावर आयातशुल्क लागू झाल्यास त्यांचे उपचार महाग होऊन सर्वसामान्य अमेरिकी नागरिकांच्या नाराजीला ट्रम्प यांना तोंड द्यावे लागेल. मात्र, भारत आणि युरोपावरील अवलंबित्व कमी करणे, अमेरिकी कंपन्यांना प्रोत्साहन देऊन उत्पादन वाढविणे; तसेच सुरू असलेल्या व्यापार कराराच्या चर्चेत भारतावर दबाव आणणे, हे ट्रम्प यांचे हेतू दिसतात भारताकडून होणाऱ्या निर्यातीमध्ये ७० टक्के वाटा जेनेरिक औषधांचा आहे. त्यावर सध्या तरी ट्रम्प यांनी आयातशुल्क लावलेले नाही; मात्र ट्रम्प यांचा लहरीपणा पाहता भविष्यात ते लागू होणारच नाही, याबाबत हमी नाही. भारतीय कंपन्यांनी अमेरिकेत उत्पादन सुरू केले, तरी तेथील मनुष्यबळ आणि उत्पादनखर्च वाढता असल्याने ती औषधे तेथे महागच होणार आहेत, तसेच भारतातून निर्यात घटणार, हे नक्की. अशा स्थितीत वाटाघाटींमधून मार्ग काढणे आणि पर्यायी बाजारपेठा शोधणे, हेच पर्याय असून, व्यापार करारामध्ये भारताचे हितरक्षण करताना भारताच्या कूटनीतीचा कस लागणार आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

एकनाथ शिंदे यांच्यासोबत खरंच फाईल वॉर सुरु? देवेंद्र फडणवीस पहिल्यांदाच उघडपणे म्हणाले...

वृत्तसंस्था/मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोन्ही बडे नेते एकाच सरकारमधील मंत्री असले तरी दोन्ही नेत्यांमध्ये अंतर्गत शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात नेहमीच सुरु असते. एकनाथ शिंदे यांनी नाराजीतून मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारल्याची चर्चेपासून ते शिंदेंनी दिल्लीला जावून भाजपश्रेष्ठींकडे फडणवीसांची तक्रार केल्याची चर्चा असेल, प्रत्येक वेळी दोघांमधील कथित अघोषित संघर्षाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरु असते. यामुळे या दोन्ही नेत्यांमध्ये खरंच शीतयुद्ध सुरु आहे का? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात निर्माण होतो. याबाबत देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी अत्यंत मनमोकळेपणाने प्रतिक्रिया दिली. देवेंद्र फडणवीस यांनी एबीपी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत अनेक मुद्द्यांवर भाष्य केलं आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबत आमचं नेहमीच चांगलं नातं राहिलेलं आहे. यापुढेही चांगलेच राहतील. आमच्या एवढ्या कॅबिनेट बैठका झाल्या. दर मंगळवारी आमच्या कॅबिनेट बैठका होतात. या सर्व बैठकांमध्ये केवळ एका बैठकीत एकनाथ शिंदे आले नाहीत. त्या दिवशी खूप पाऊस पडत होता. त्यांनी मला फोन केला की, मी ठाण्यात आहे. इथे खूप पाऊस पडलाय. तर मी इथे जी व्यवस्था आहे ते पाहू इच्छित आहे. त्यामुळे मी येणार नाही. त्यामुळे ते नाही आले. आमच्यात सर्व ठिकठाक आहेङ्खङ्ख, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.ङ्खङ्खमी आधी मुख्यमंत्री होतो आणि माझ्या मंत्रिमंडळात ते मंत्री होते. त्यानंतर त्यांच्या मंत्रिमंडळात मी उपमुख्यमंत्री बनलो. यानंतर मी पुन्हा मुख्यमंत्री बनलो आणि माझ्या मंत्रिमंडळात ते उपमुख्यमंत्री बनले. त्यांनी माझ्या नेतृत्वात काम केलं आहे आणि मी देखील त्यांच्या नेतृत्वात काम केलं आहे. त्यामुळे ही खूप मोठी डील आहे असं वाटत नाही. मी तर पाच वर्ष लगातार मुख्यमंत्री राहिलो. त्यानंतर मी उपमुख्यमंत्री म्हणून काम करत राहिलो. मी त्या काळात मुख्यमंत्र्यांचा कोणताही प्रोटोकॉल मोडला नाही. तसेच मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी मला जो आदर द्यायला हवा तो त्यांनी नेहमीच दिला, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.पहिली गोष्ट म्हणजे कोणताही फाईल वॉर सरु नाही. मला असं वाटतं की, कोणत्या फाईलमध्ये कायदेशीररित्या काही गोष्टी करायला हव्यात तर मी मंत्र्यांना बोलवतो. त्यांना मी काय करायला हवं ते सांगतो. फाईल आल्या आणि थांबल्या असं कधी होत नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनीदिली.

तळेगाव चाकणशिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८

फडणवीस भाजपचे अध्यक्ष होणार, दिल्लीला जाणार?

संघाचा विशेष उल्लेख करत चं ठासून उत्तर..

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी कोणाची निवड होणार याबद्दल उत्सुकता कायम आहे. विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ संपून दीड वर्ष उलटलं आहे. त्यांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे. पण अद्याप तरी भाजपला राष्ट्रीय अध्यक्ष मिळालेला नाही. या पदासाठी अनेक दिग्गजांची नावं चर्चेत आहेत. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नाव आघाडीवर आहे. यावर फडणवीस यांनी भाष्य केलं आहे. भाजपचं अध्यक्षपद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भाजपमधील भूमिका यावर देवेंद्र फडणवीस सविस्तर बोलले. इंडिया टुडे समूहाच्या व्यासपीठावर त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केलं. पाच वर्षे मुख्यमंत्री राहणार असून महाराष्ट्र सोडून कुठेही जाणार नाही, असं फडणवीस यांनी स्पष्ट केलं. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची नेमणूक गेल्या दीड वर्षांपासून रखडलेली आहे. त्यावरही फडणवीस सविस्तर बोलले. भाजप अध्यक्ष पदासाठी कोणत्याही प्रकारचा पेच नाही. भाजप अध्यक्ष पदासाठी अनेक नावांची चर्चा माध्यमांमध्ये सुरु आहे. यातील काही नावं ऐकून तर मला आश्चर्याचा धक्काच बसला, असं फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या महत्त्वाकांक्षांबद्दल प्रश्न विचारण्यात आला. मी भाजपसाठी काम करतो. मुंबईत कोणी असावं, दिल्ली किंवा नागपूरमध्ये कोण असावं हे आमच्या पक्षात कोणी एक व्यक्ती ठरवत नाही. भाजपमध्ये एक व्यक्ती निर्णय घेत नाही, तर पक्ष ठरवत असतो, असं फडणवीस यांनी सांगितलं. मला जिथपर्यंत भाजपची कार्यपद्धती माहीत आहे, त्या आधारे मी इतकं नक्कीच सांगू शकतो की मी पुढील ५ वर्षे महाराष्ट्रातच आहे. पाच वर्षांनंतर पक्ष जो निर्णय घेईल, तसं होईल, असं फडणवीस यांनी म्हटलं.भाजपला नवा राष्ट्रीय अध्यक्ष कधी मिळणार, असा प्रश्न फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न तुम्ही करु नका, पक्ष या प्रश्नाचं उत्तर लवकरच शोधेल, असं उत्तर फडणवीस यांनी दिलं. सगळ्या गोष्टी योग्य वेळी होतील. सगळ्या समस्या सोडवल्या जातील. सध्याच्या घडीला कोणताही पेच नाही. अध्यक्ष पदाची निवडणूक लवकरच होईल, असं फडणवीस म्हणाले. भाजपचा अध्यक्ष होणारा नेता तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेचा असेल, असं फडणवीस यांनीठासूनसांगितलं.

आधी चुकांवर पांघरूण घालायला साहेब होते अन् आता.. अजितदादांनी सभेत काढली काकांची आठवण

वृत्तसंस्था/ पुणे

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाला अधिक बळकटी देण्यासाठी कंबर कसली आहे. यात राष्ट्रवादी परिवार मिलन कार्यक्रम असो किंवा जनसंवाद यामध्ये अजित पवार सामान्य नागरिकांपासून आपल्या पक्षातल्या प्रत्येक नेत्यांना भेटून पक्षाला बळ देत आहेत. अशातच आता पुणे जिल्ह्यात अजित पवार यांच्या पक्षात अनेक तगड्या नेत्यांनी प्रवेश केला आहे. पुण्यातील शिवाजीनगर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात भाजप, राष्ट्रवादी (शप) पक्षाच्या अनेक मान्यवरांनी जाहीर पक्ष प्रवेश केला. यात भाजपचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष जालिंदर कामठे, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे मुरलीधर निंबाळकर तसंच मारुती किंडरे, स्वाती चिटणीस, काँग्रेसचे रोहन सुरवशे यांच्यासह अनेक महिला व कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. या सर्वांचं अजित पवारांनी स्वागत केलं, या कार्यक्रमाच्या निमित्तानं अजित पवारांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित केलं. यामध्ये अजित पवारांनी शरद पवारांचा उल्लेख करताच उपस्थितांमध्ये हशा पिकला.अजित पवार म्हणाले, आज वेगवेगळ्या ठिकाणी काम केलेल्या नेत्यांचा प्रवेश झाला हे ठीक आहे. आपण वेगवेगळ्या ठिकाणी काम केलेलं आहे. पण शेवटी आपल्याला एकमेकांमध्ये समरस होऊन काम करणं महत्त्वाचं आहे. आपल्या सर्वांना एकमेकांचे स्वभाव, एकमेकांची मतं माहीत आहेत. त्यामुळे आज अजित पवारांना भेटावं की नाही त्यांचा मूड कसा आहे हे जालिंदर कामठे यांना चांगलं कळतं. पण मागचा अजित पवार आणि आत्ताचा अजित पवार यामध्ये खूप फरक आहे. काळानारूप जसं वय वाढतं तसं आपल्याला बदलावं लागतं, माणसात मॅच्युरिटी येते. पूर्वी आपण काही केलं तर आपल्यावर पांघरुण घालायला साहेब असायचे. आता आपणच पांघरुण घ्यायचं, असं अजित पवारांनी म्हणताच सभागृहामध्ये एकच हशा पिकला.गेल्या काही दिवसांमध्ये अजित पवार यांच्या वक्तव्यावरून अनेक वाद झाल्याचे पाहायला मिळाले. आयपीएस अंजना कृष्णा यांच्या फोन कॉलचा वाद असो किंवा सगळ्याचं सोंग घेता येतं पैशाचं नाही या वक्तव्यावरून झालेला वाद असो. या सगळ्या वादांमध्ये अजित पवार यांना स्पष्टीकरण द्यावं लागलं होतं. त्यामुळे आता आपल्या चुकांवर आपल्यालाच पांघरुण घालावं लागतं. आधी चुकांवर पांघरून घालायला साहेब होते, असं मिश्किलपणे म्हणत अजित पवारांनी शरद पवारांची आठवण काढली. अजित पवारांच्या या वक्तव्याची आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

२६/११ला मी आणि माझा नवरा ताज हॉटेलमध्ये अडकलेलो अन... सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्रीनं सांगितला प्रसंग...

वृत्तसंस्था/मुंबई

टीआरपीच्या यादीत टिकून राहण्यासाठी प्रत्येक चॅनल नव-नवीन प्रयोग करत आहेत. नव्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येत आहेत. अशातच आता स्टार प्रवाह वाहिनीने सलग दोन मालिकांची घोषणा केली. स्टार प्रवाहवर लपंडाव आणि नशीबवान या दोन मालिका सुरू झाल्या आहेत. त्यापैकी नशीबवान मालिकेत मोठ-मोठ्या कलाकारांची मांदियाळी आहे. अशातच या मालिकेच्या प्रमोशनदरम्यान मालिकेतील अभिनेत्रीनं धक्कादायक प्रसंग सांगितला. हा तिचा दुसरा जन्म असल्याचं तिनं सांगितलं आहे.नशीबवान मालिकेमध्ये मराठी अभिनेत्री सोनाली खरेनं उर्वशी ही खलनायिकेची भूमिका साकारली आहे. या मालिकेच्या प्रमोशनदरम्यान रत्न मराठी मीडियाला दिलेल्या मुलाखतीमध्ये अभिनेत्रीला तिच्या आयुष्यातील एखादा असा प्रसंग ज्यामुळे ती स्वतःला नशीबवान समजते, असा प्रश्न विचारण्यात आला.त्यावर सोनाली म्हणाली की, मी म्हणेन नशिबाने आणि देवाच्या कृपेने ते म्हणजे

२६/११ला मी आणि माझा नवरा अडकलो होतो, ताज हॉटेलमध्ये. ती अख्खी रात्र आणि आमची जिथून सुटका झाली त्यानंतर मी घरी जाऊन माझ्या चार महिन्याच्या मुलीला बघितलं, तेव्हा मला समजलं मी नशीबवान आहे आणि देवाने मला हा दुसरा जन्म दिलाय. देवाने मला आशीर्वाद दिलाय की, हे घे हे तुझं नवीन आयुष्य आहे, ते तुला आणखीन चांगल्याप्रकारे जगायचंय, ती चांगल्याप्रकारे घालव. ती वेळ माझ्यासाठी नशीबवान होती, त्यापेक्षा जास्त माझ्यासाठी नशीबवान काही असू शकत नाही. दरम्यान, नशीबवान या मालिकेतून सोनालीनं अनेक वर्षांनी टीव्हीवर पुन्हा पदार्पण केलं आहे. त्याबद्दल सांगताना अभिनेत्री म्हणालेली की, चित्रपट, ओटीटी अशा विविध माध्यमातील कलाकृतींच्या कामामुळे टीव्हीवर काम करणं जमून येत नव्हतं. छोट्या पडद्यावर दिसत नव्हते, तरी अनेकांच्या संपर्कात होते. त्यामुळे मला हे माझं पुनरागमन वाटत नाहीये. ज्या माध्यमानं मोठं केलं आणि तिथे परतल्याचा आनंद आहे. आता दररोज प्रेक्षकांना भेटू शकते. चित्रपट, ओटीटी अशी कितीही माध्यमं आली, तरी छोट्या पडद्यावर काम करूनच प्रेक्षकांचं खरं प्रेम मिळतं. मला मालिकांमुळेच प्रसिद्धीमिळालीये.

काम न मिळाल्यामुळे बॉलिवूड अभिनेता झालेला बेहाल; म्हणाला, मी दारूच्या आहारी गेलेलो आणि...

वृत्तसंस्था/मुंबई

सुप्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता बॅड्स ऑफ बॉलिवूडफमुळे चर्चेत आहे. बॉबीने आजपर्यंत अनेक सिनेमांमध्ये काम केलंय. पण, अभिनेत्यावर एक वेळ अशी आलेली की, तो अडचणींचा सामना करत होता आणि त्यादरम्यान तो दारूच्या आहारी गेला होता. याबद्दल त्याने स्वतः एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. बॉबी देओलने नुकतीच राज शमानीला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्याच्या कठीण काळाबद्दल सांगितलं आहे. बॉबी म्हणाला की, मी माझ्या कुटुंबासाठी काम करतोय, पण त्यांच्या डोळ्यात मला माझ्याबद्दलची भीती दिसायची. असं नाहीये की मी दररोज दारू प्यायचो, पण जेव्हा मी दारू प्यायलेलो असायचो तेव्हा ते मला खूप घाबरायचे. दारू ड्रग्जपेक्षाही जास्त भयानक आहे आणि ती तुमच्या मेंदूला विचलित करते.मी खूप कठीण काळातून जात होतो. माझा भाऊ, वडील सगळ-ेच पूर्वी करायचे तितकं काम करत नव्हते. घरात थोडी अडचण होती, पण माझ्या भावाने मला कधीच ती जबाबदारी घेऊ दिली नाही. त्याने मला त्या टेन्शनपासून दूर ठेवलं. मी कित्येकदा कसा दिसतोय हेस-ुद्धा आरशात पाहायचो नाही. त्यामुळे मला प्रश्न पडतो की, माझ्या अभिनयापेक्षाही माझ्या दिसण्याला अधिक महत्त्व कसं देण्यात आलं. एकदा तर मी घरी बसलेलो असताना माझा मुलगा माझ्या बायकोला म्हणाला, तू रोज कामावर जातेस आणि बाबा मात्र घरीच बसलेला असतो. त्याच्या त्या वाक्यामुळे मला खूप त्रास झाला. मी विचार केला की, मी कसा वडील आहे आणि त्यामुळे बऱ्याच गोष्टी बदलल्या. असं बॉबीने पुढे सांगितलं.बॉबी पुढे म्हणाला की, तुम्ही काहीच कामाचे नाहीत ही भावना माझ्या मनात निर्माण झाली आणि त्याचा माझ्यावर खूप परिणाम झाला. तेव्हा मी दारूचा आधार घ्यायचो, त्यामुळे मी माझ्या आरोग्यावर याचा काय परिणाम होईल हा विचार न करता खूप दारू प्यायला लागलो. मी दारूच्या आहारी गेलो होतो. मी इतरांना दोष द्यायला लागलो. मला इतर कलाकारांचा हेवा वाटायचा. पण, ते यशस्वी का होत आहेत याचा विचार करायचो नाही. ते खूप मेहनत करत होते म्हणून त्यांना यश मिळत होतं. सलमान खान, शाहरुख खान, आमिर खान, अक्षय कुमार आज जे काही आहेत, ते त्यांच्या मेहनतीमुळे दारू सोडण्याबद्दल बॉबी म्हणाला की, पण, अशा वागण्याचा आपल्या जवळच्या व्यक्तींना खूप त्रास होतो आणि त्यामुळेच मी दारू पिणं सोडलं. आता एक वर्षांहून अधिक काळ लोटला आहे, मी दारू पिणं सोडलंय-

फराह खानने करण जोहरला घातलेली लग्नाची मागणी, स्वतःच दिलेली कबुली

वृत्तसंस्था/मुंबई

फराह खान अनेक वर्षांपासून बॉलिवूडमध्ये सक्रीय आहे. फरहने अनेक गाजलेले सिनेमे बॉलिवूडला दिले आहेत. फराह तिच्या युट्युब चॅनलमुळे चर्चेत असते. मात्र, आता फराहचा एका कार्यक्रमादरम्यानचा व्हिडिओ व्हायरल होतोय. तुम्हाला माहितीये का? फराहने करण जोहरला लग्नासाठी प्रपोज केलेलं. या व्हिडिओमध्ये फराह खान त्याबद्दलच बोलताना दिसत आहे. फराह खानला दिग्दर्शक आणि निर्माता करण जोहरसोबत लग्न करायचं होतं. करण आणि फराह अनेक वर्षांपासून एकमेकांना ओळखता. करण जोहरचा पहिल्या चित्रपट कुछ कुछ होता है मध्ये फराहने छोटीशी भूमिकासुद्धा केली होती.फार कमी लोकांना माहिती आहे की, फराह खानने एकदा करण जोहरला प्रपोज केलेलं. पण, करणने लग्नासाठी नकार दिला. साजिद खान आणि रितेश देशमुख यांच्यासोबत यारों की बारात या चॅट शोमध्ये करण जोहरने खुलासा केला की, फराह खान तो खूप आवडायचा. फराह खानने नंतर कबुली दिली. करण जोहरने सांगितलं की, स्कॉटलंडमध्ये कुछ कुछ होता है च्या शूटिंगदरम्यान, फराह खान मध्यरात्री त्याच्या खोलीत आली. करणने सांगितलं की, फराह खान मध्यरात्री त्याच्याकडे आली आणि म्हणाली माझ्या खोलीत एक भूत आहे.फराह म्हणाली की, मी करणला लग्नासाठी प्रपोज केलेलं. त्यावर करण म्हणाला की, त्याने तांत्रिक समस्येमुळे फराहची ऑफर नाकारली. पुढे गंमतीत करण म्हणाला की, टेलिव्हिजन टॉवर चालू राहायला पाहिजे म्हणून म्हटलं टीव्हीच बंद करुया.दरम्यान, फराह खानच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं तिच्या करिअरची सुरुवात कोरिओग्राफर म्हणून केली. त्याचबरोबर तिने अनेक चित्रपटांचं दिग्दर्शनसुद्धा केलं आहे. आजपर्यंत फराहने मैं हूं ना, ओम शांती ओम, तीस मार खान, आणि हॅपी न्यू इयर सारखे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. त्याचबरोबर करण जोहरच्या कामाबद्दल सांगायचं तर त्याने कभी खुशी कभी गम, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, कल हो ना हो यांसारख्या गाजलेल्या सिनेमांचं दिग्दर्शनकेलंय.

डिजिटल शेतीकडे वाटचाल! महाॲग्री धोरणामुळे शेतकऱ्यांना मिळणार नवीन तंत्रसुविधा...

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्र कृषी- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ या धोरणास मंगळवारी मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दर्शविला असून, या निर्णयामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता, रोबोटिक्स आणि पूर्वानुमान विश्लेषण यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत व विस्तारयोग्य उपाययोजना राबविता येणार आहेत. या धोरणामुळे राज्यातील अँग्रिस्टेक, महा-ॲग्रिस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डीबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय रचना असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र वेगाने बदलणारे आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांत या धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यात येतील. त्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नावीन्यता केंद्र, कृषी विद्यापीठांतर्गत कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नावीन्यता केंद्र काम करतील.आयआयटी/आयआयएससीसारख्या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता आणि इनक्युबेशन केंद्र स्थापण्यात येतील. त्याशिवाय डेटा-आधारित शेती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी उपयोगी ठरतील अशा डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. या सुविधा राज्यव्यापी, सुरक्षित, सुसंगत व संमती-आधारित डेटा देवाण-घेवाण सुलभ करतील. क्लाऊड आधारित कृषी डेटा एक्स्चेंज आणि सँडबॉक्सिंग सुविधा उपलब्ध केली जाईल, या डिजिटल प्लॅटफॉर्मशी केंद्र व राज्य सरकारचे शेती संबंधीत सर्व डेटाबेस जोडण्यात येतील. कृषी विस्तार सेवा अधिक प्रभावी व शेतकरी-केंद्रित बनवण्यासाठी विस्तार उपक्रम राबवण्यात येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून जनरेटिव्ह आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा उपयोग / करून

शेतकऱ्यांना मराठीतून वैयक्तिक सल्ला दिला जाईल. या उपक्रमांतर्गत मराठीत कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित चॅटबॉट्स, व्हॉईस असिस्टंट्स यांची मदत घेतली जाईल. त्याद्वारे पीक उत्पादन, रोग-कीड व्यवस्थापन, हवामान अंदाज, बाजारभाव व योजनांची माहिती देण्यात येईल.अन्नसुरक्षा, पुरवठा साखळीतील पारदर्शकता, अन्न गुणवत्ता हमी आणि शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी कृत्रिम बुद्धिमता, ब्लॉकचेन आणि क्यू-कोड तंत्रज्ञानावर आधारित राज्यव्यापी शोधक्षमता व गुणवत्ता प्रमाणीकरण प्लॅटफॉर्म उभारण्यात येईल. या प्लॅटफॉर्मद्वारे शेतापासून ग्राहकापर्यंतच्या प्रवासात पिकांना दिलेली खते व औषधे, शेती पद्धती, कापणीपश्चात प्रक्रिया व गुणवत्ता प्रमाणपत्र इत्यादी बाबींचे डिजिटल आणि जिओ-टॅग केलेली नोंद वही तयार करेल.

ऑनलाईन कसं लुटलं जात होतं?

मोठा उलगडा, ४४ बँक खाती गोठवली, तब्बल १९ कोटी सील, ईडी सुद्धा तपासासाठी मैदानात

वृत्तसंस्था/रायगड

अलीकडच्या काळात भारतात मोबाईल इंटरनेटचा प्रसार, डिजिटल पेमेंटची सोय आणि मनोरंजनाच्या नव्या माध्यमांचा उदय यामुळे ऑनलाईन बेटिंग ॲप्सचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. हे ॲप्स प्रामुख्याने क्रिकेट, फुटबॉल, टेनिस अशा क्रीडा प्रकारांवर पैज लावण्याची संधी देतात. याशिवाय काही ॲप्समध्ये कॅसिनो गेम्स, पत्त्यांचे खेळ किंवा स्लॉट मशिन प्रकारचे जुगारही उपलब्ध असतात. ङ्कमी पैशांत मोठा नफाफ या लालसेवर आधारित या ॲप्सचे जाळे इतके वेगाने पसरत आहे की, त्याचे व्यसन अनेक तरुणांना अगदी किशोरवयीन मुलांनाही आहारी नेत आहे. असाच एक प्रकार रायगड जिल्हा पोलीस दलाच्या सायबर गुन्हे शाखा यांनी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली उघडकीस आणला. त्यात एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. जवळपास साडे एकोणीस कोटी रुपये गोठविण्यात आले आहेत. सायबर गुन्हे शाखेत अमित बापु जाधव नावाचा फिर्यादी आला होता. त्याचे म्हणणे होते की त्याच्या मोबाईलवर विविध ऑनलाईन गेमिंगच्या जाहिराती येत होत्या. त्यातील एक ॲपच्या आमिषामध्ये तो फसला. त्याने त्यामध्ये दहा हजार रुपये, पंचवीस हजार रुपये तसेच पंधरा हजार असे एकूण पन्नास हजार रुपये टाकले. त्याची समज झाली की, सदर ॲप हे प्ले स्टोअरवर उपलब्ध असल्याने ते कायदेशीर असतील.मटका जुगार हे अनधिकृत आहे तर बंद असेल. मात्र प्ले स्टोअरवर असल्याने फिर्यादी जाधव याने त्यामध्ये गुगल वॉलेटमधून पैसे टाकले. त्याला पैसे मिळाले नाही म्हणून त्यानंतर त्याने सदर ॲप्सवाले यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काही संपर्क झाला नाही. त्यानंतर तो पोलिसांकडे मदत मागण्यासाठी आला. या प्रकरणी अलिबाग (रायगड) सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. ८/२०२५ अन्वये १९ सप्टेंबर २०२५ रोजी ऑनलाइन गेमिंग आणि जुगार ॲपद्वारे फसवणुकीचा मोठा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अमित बापु जाधव यांच्याकडून ए एम ९९९ऑनलाईन गेम्स ॲप, मधुर मटका परिमॅच,

यांसारख्या ॲपवरून दहा हजार रुपये फसवले गेल्याने त्यांनी तक्रार नोंदवली होती.अमित बापू जाधव यांचे पैसे हे भारमल हनुमान मिना (रा. उलियाना, सवाई माधवपूर, राजस्थान) याच्या बँक खात्यात जमा झाले होते. याबाबत अधिक माहिती घेतली असता भारमल हनुमान मिना आणि त्याच्या कुटुंबातील नऊ जणांच्या खात्यात पैसे जमा होत होते. प्रत्येकाच्या खात्यात १ लाख कमिशन आणि इतर रक्कम जमा होत होती. त्याचप्रमाणे सामान्य नागरिकांच्या आणि लहान दुकानदारांच्या नावावर करंट अकाउंट्स उघडून मोठ्या प्रमाणावर पैशांची देवाण-घेवाण केली जात होती. बँक भुवनेश्वर शाखेतील पॉक्सिस, एल ए पितुरा, अपेक्सिओ लि यांसारख्या बँक खात्यांमधून मागील दोन महिन्यांत असंख्य कोटी रुपयांचे व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. अंमलबजावणी संचालनालयकडून () देखील या प्रकरणाचा तपास सुरू आहे. सुमारे ३००० कोटी रुपयांची रक्कम जवळपास पाचशे म्यूल खात्यांत गोठवण्यात आली आहे. एन एस संचालक सुजाता शाहू (वय ५५ वर्षे) ही एक गृहीणी असून त्यांच्या साध्या अकाउंटवर शिल्लक रक्कम दहा हजार रुपये असे असून त्यामध्ये गेले दोन महिन्यांमध्ये ११४ कोटी रूपयांचे व्यवहार झाल्याचे दिसून येत आहे. एल ए पितुरा संचालक शौभाग्यरंजन बेहेर सर्वसामान्य इसम असून त्यांच्या सध्या अकाउंटवर शिल्लक रक्कम १ लाख २५ हजार रुपये असून त्यामध्ये गेल्या दोन महिन्यांमध्ये १८६ कोटी रूपयांचे व्यवहार झाल्याचेस्पष्टझाले.

वात, पित्त व कफचा त्रास कायमचा होईल छुमंतर...

फक्त रोज सकाळी खा हे एक फळ, या पद्धतीने खाल्ल्यास झटक्यात दिसेल फरक...

जनसंचलन/बुलढाणा

गेल्या काही काळात आपल्या दैनंदिन जीवनशैलीत झपाट्याने बदल होत आहेत. आहाराची पद्धत, झोपेचे वेळापत्रक, मानसिक ताण आणि शारीरिक हालचालींची कमतरता यामुळे अनेक आरोग्य समस्या वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत लोक पुन्हा नैसर्गिक उपायांकडे वळताना दिसत आहेत. कारण, औषधोपचारांपेक्षा शरीराचे संतुलन नैसर्गिक पद्धतीने राखणे जास्त सुरक्षित मानले जाते. आयुर्वेद या दृष्टीने शेकडो वर्षांपासून एक महत्त्वाचा आधार आहे. आयुर्वेदातील अनेक औषधी वनस्पती आणि फळे आज आधुनिक विज्ञानातसुद्धा मान्यता मिळवत आहेत. यामध्ये एक फळ आहे जे आपल्या घराघरात सहज उपलब्ध आहे आणि जवळपास प्रत्येक भारतीयाला माहीत आहे. हे फळ आंबट-गोड चवीचे, परंतु आरोग्याच्या दृष्टीने खूप प्रभावी आहे. शरीरातील दोषांचे संतुलन राखण्यापासून ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापर्यंत त्याचे असंख्य फायदे सांगितले जातात. म्हणूनच ते आयुर्वेदात अमृतासमान मानले गेले आहे. ते फळ म्हणजे आवळा!





आवळा आणि त्रिदोष संतुलन

आयुर्वेदात वात, पित्त आणि कफ हे तीन दोष मानवी शरीराचे आधारस्तंभ मानले जातात. या दोषांचे संतुलन बिघडले की आजार उद्भवतात असे शास्त्र सांगते. आवळ्यामध्ये असलेल्या व्हिटॅमिन सी, अँटीऑक्सिडंट्स आणि खनिजांमुळे तो या तिन्ही दोषांवर परिणाम करतो. वात शांत करून तो अस्थिरता कमी करतो, पित्तामुळे होणारी जळजळ कमी करतो आणि शरीराला थंडावा देतो, तसेच कफामुळे होणारा जडपणा व कफस्राव कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे आवळ्याचे नियमित सेवन शरीरात तिन्ही ऊर्जांचे संतुलन राखते.

आधुनिक शास्त्रानुसार आवळ्याचे गुण

आयुर्वेदाबरोबरच आधुनिक शास्त्रानेही आवळ्याचे फायदे सिद्ध केले आहेत. संशोधनानुसार आवळ्यामध्ये अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात जे शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करतात. यामुळे पेशींवर होणारे अकाली वृद्धत्व टाळले जाते. त्याचबरोबर आवळा यकृताचे कार्य सुधारतो, पचनक्रिया सुरळीत ठेवतो आणि हृदयविकाराचा धोका कमी करतो. रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास तो उपयुक्त ठरतो, त्यामुळे मधुमेहग्रस्त व्यक्तींसाठीही तो फायदेशीर मानला जातो.

दैनंदिन जीवनात आवळ्याचा समावेश

आवळ्याचा उपयोग अनेक पद्धतींनी करता येतो. सकाळी ताज्या आवळ्याचा रस पाण्यात मिसळून घेतल्यास शरीराला ऊर्जा मिळते. आवळ्याची पावडर कोमट पाण्यात किंवा हर्बल टीमध्ये मिसळून घेता येते. कच्चा आवळा खाल्ला तरी फायदेशीर आहे, तसेच त्याचा मुरंबा, लोणचं किंवा चटणी बनवून खाल्ल्यासही तो उपयोगी ठरतो. त्वचेसाठी आणि केसांसाठी आवळ्याचे तेल किंवा फेसपॅक म्हणूनही तो वापरला जातो. त्यामुळे तो फक्त आहारापुरता मर्यादित न राहता सौंदर्य टिकवण्यासाठीही उपयोगी आहे.

आवळा आणि मानसिक आरोग्य

फक्त शरीरापुरतेच नव्हे तर मन शांत ठेवण्यातही आवळ्याची महत्त्वाची भूमिका आहे. आयुर्वेदानुसार कफ दोषामुळे मनात जडपणा आणि उदासीनता वाढू शकते. आवळा हे संतुलन राखतो आणि मन प्रसन्न ठेवतो. त्यातील पोषक तत्त्वे मेंदूच्या कार्यक्षमतेला मदत करतात, एकाग्रता वाढवतात आणि तणाव कमी करतात. त्यामुळे आधुनिक तणावग्रस्त जीवनशैलीत आवळा मानसिक आरोग्यासाठी नैसर्गिकआधारठरूशकतो.

अरबी महिला का दिसतात दुधासारख्या पांढ-याशुभ्र? किचनमधील या खास पदार्थांनी करतात जादू, चेह-यावर रगडताच होते कमाल

अरब देशांतील महिलांचे सौंदर्य हे नेहमीच लोकांच्या चर्चेचा विषय ठरते. त्यांच्या त्वचेला पाहिलं की तिच्या निखळ उजळपणावर आणि नैसर्गिक ग्लोवर नजर खिळून राहते. अनेकदा आपल्या मनात प्रश्न निर्माण होतो की इतका मोहक निखार नेमका येतो कुठून? केवळ महागडे सौंदर्यप्रसाधन किंवा क्लिनिकमधील उपचार इतकं मोठं चमत्कार घडवू शकत नाहीत, याची जाणीव सर्वांनाच असते. म्हणूनच त्यांच्या सौंदर्याचे रहस्य जाणून घेण्याची उत्सुकता प्रत्येकाला असते.खरं तर ते आपल्या दैनंदिन जीवनात काही साध्या पण सातत्यपूर्ण सवयींचा अवलंब करतात. यामुळे त्यांची त्वचा नेहमीच उजळ आणि ताजीतवानी दिसते. विशेष म्हणजे, ही माहिती एका नामांकित त्वचारोगतज्ज्ञ डॉ. शिरीन फातिमा यांनी स्पष्ट केली आहे. चला तर मग जाणून घेऊया ही नैसर्गिक पद्धत काय आहे आणि त्यामागचं गुपित नेमकं कसं कार्य करतं.

ओट्समुळे मिळणारा ओलावा

ओट्स हे फक्त आरोग्यासाठीच नव्हे तर त्वचेच्या देखभालीसाठीही उपयोगी ठरतात. यामध्ये आढळणारे बीटा-ग्लूकन त्वचेला आवश्यक ती ओलावा देतात. यामुळे कोरडेपणा, खाज किंवा चिडचिड कमी होते. स्क्रबमध्ये ओट्स मिसळल्याने त्वचेला एक सौम्य पण परिणामकारक ट्रीटमेंट मिळते. यामुळे त्वचेचा टेक्श्चर सुधारतो आणि ती अधिक गुळगुळीत व मुलायम बनते. विशेष म्हणजे, संवेदनशील त्वचेसाठी हा एक सुरक्षित पर्याय मानला जातो.

तांदळाच्या पिठाची जादू

अरब महिलांच्या सौंदर्यातील पहिलं गुपित म्हणजे तांदळाचं पीठ. हे घराघरात सहज उपलब्ध असलेलं घटक त्वचेला एक नेचरल स्क्रबरचा अनुभव देतं. तांदळाच्या पिठामध्ये असलेले स्टार्च आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेतली घाण, धुळीचे कण आणि डेड स्किन दूर करून चेहऱ्याला नवीन तजेला देतात. नियमित वापरामुळे टॅनिंग कमी होतं, तसेच चेहऱ्याचा रंग अधिक स्वच्छ दिसू लागतो. त्वचेतील पोर्स खुल्या राहतात आणि त्यावर जमा होणारा तेलकटपणा कमी होतो. यामुळे चेहरा नेहमीच तजेला व ताजातवाना

तिळाचे पोषणदायी गुण

अरब सौंदर्यपद्धतीत तिळाला खास स्थान आहे. त्यामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन ई आणि आवश्यक फॅटी ॲसिड्स असतात, जे त्वचेतील पेशींना खोलवर पोषण देतात. वृद्धत्वामुळे येणाऱ्या सुरकुत्या आणि रेषा कमी करण्याची ताकद तिळात आहे. म्हणूनच हा घटक अँटी-एजिंग नैसर्गिक उपाय म्हणून प्रसिद्ध आहे. तिळामुळे त्वचेचा पोत मऊसर व लवचिक राहतो, ज्यामुळे चेहरा तरुण आणि तजेलदार भासतो.

दह्याची नैसर्गिक चमक

दही हा प्रत्येक स्वयंपाकघरात असणारा पदार्थ असून त्यात लॅक्टिक ॲसिड भरपूर प्रमाणात असतं. हे त्वचेला सौम्य पद्धतीने एक्सफोलिएट करून डेड सेल्स काढून टाकतं. यामुळे चेहरा अधिक उजळ व गुळगुळीत दिसतो. दही नैसर्गिक क्लींझर म्हणूनही ओळखलं जातं कारण ते त्वचेतील घाण काढून तिला निरोगी ठेवतं. नियमित वापरामुळे त्वचेला नेचरल टोनिंगचा परिणाम मिळतो आणि ती नेहमीच ताजी राहते.

घरी कसा बनवावा हा नैसर्गिक स्क्रब

हा उपाय करण्यासाठी आधी तांदळाचे पीठ, ओट्स, तीळ आणि दही मिक्सरमध्ये एकत्र करा. या घटकांची पेस्ट बनवा. हे एक अद्भुत स्क्रब आहे. तुमचा चेहरा स्वच्छ करा आणि ही पेस्ट तुमच्या चेहऱ्याला लावा. नंतर तुमचा चेहरा हलक्या हाताने घासून घ्या, ज्यामुळे चेह-यावरील छिद्रांत साचलेली घाणही निघून जाईल व अरेबियन महिलांसारखा चमकदारचेहरामिळेल

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाची नवी सार्वजनिक उद्घोषणा यंत्रणा विकसित

नागरिकांना आपत्ती सतर्कतेच्या सूचना मिळणार

३३ पोलीस ठाण्यात यंत्रणा सुरू

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांपर्यंत सूचना तत्काळ पोहोचवण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने नवी सार्वजनिक उद्घोषणा यंत्रणा विकसित केली आहे. या माध्यमातून आपत्ती, आपत्कालीन परिस्थिती किंवा महत्वाच्या सूचना मोठ्या प्रमाणावर जनतेपर्यंत पोहोचवता येणार आहेत. ही उद्घोषणा यंत्रणा जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जिल्ह्यातील ३३ पोलीस ठाण्यांमध्ये बसविण्यात आली असून तिच्या माध्यमातून सूचना थेट गावागावात पोहोचतील. तसेच जिल्हा आपत्ती उद्घोषणा यंत्रणेच्या ८६३४५१२२०१ या क्रमांकावरून आपत्ती संबंधित महत्वाचे व तातडीचे कॉल्स व संदेश दिले जाणार आहेत. नागरिकांना वेळेवर सतर्कतेच्या व सुरक्षेविषयी योग्य माहिती मिळाल्यास जीवित आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे. तसेच सर्व नागरिकांनी आपल्या मोबाईलवर बुलढाणा जिल्हा आपत्ती उद्घोषणा क्रमांक ८६३४५१२२०१ सेव्ह करून ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी या प्रणालीचा उपयोग करून सजग राहण्याचे आणि आपत्ती काळात प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी यांची नांदुऱ्यातील चांदूर बिस्वा येथील महाराजस्व समाधान शिबिराला भेट

जनसंचलन/बुलडाणा

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा राबविला जात आहे. त्याअंतर्गत नांदुरा तालुक्यातील चांदूर बिस्वा येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराजस्व समाधान शिबिराला आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली. या शिबिरात जिल्हाधिकाऱ्यांनी थेट लाभार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. महसूल विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देत, त्याचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. या शिबिरात जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत सातबारे, विविध महसुली दाखले, भूमिहीनांना घरकुलासाठी जागा वाटप प्रमाणपत्र अशा विविध लाभांचे वितरण करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी महसूल प्रशासन जनतेपर्यंत पोहोचवून सर्वसामान्य नागरिकांना गतीने सेवा मिळावी यासाठी असलेल्या समाधान शिबिराचे महत्त्व अधोरेखित केले.

सेवा पंधरवडा : जळगाव जामोद तालुक्यातील महाराजस्व समाधान शिबिरात नागरिकांना लाभांचे वितरण

आमदार डॉ संजय कुटे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची उपस्थिती

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सेवा पंधरवडा अंतर्गत जळगाव जामोद तालुक्यातील धरती आबा योजनेत समाविष्ट असलेल्या चालठाणा व पिंपळगाव काळे या गावात महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला आमदार डॉ.संजय कुटे व जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते वृक्षदिंडीचे पूजन करून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. शिबिरात नागरिकांना विविध योजनांचे लाभ वाटप करण्यात आले. यामध्ये ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी, ई-रेशन कार्ड, कागदपत्रांचा बटवा, विविध प्रमाणपत्रे, रोजगार हमी योजनेअंतर्गत जॉब कार्ड तसेच ट्रॅक्टर वाटप आदींचा समावेश होता.

शिबिरादरम्यान जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधून शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच सेवा पंधरवडा अंतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपविभागीय अधिकारी शैलेश काळे तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

गुंतवणूक रक्कम		५००	१०००	१५००	२०००	३०००	५०००
अ.क्र.	गुंतवणूक कालावधी महिने	पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम					
१	१५६	१०३४१८	२०६८३६	३१०२५४	४१३६७२	६२०५०७	१०३४१७९
२	१४४	९५५४४	१९१०८८	२८६६३३	३८२१७७	५७३२६५	९५५४४२
३	१३२	८८२६९	१७६५३८	२६४८०६	३५३०७५	५२९६१३	८८२६८८
४	१२०	८१५४४	१६३०८७	२४४६३१	३२६१७५	४८९२६२	८१५४३६
५	१०८	७५३३६	१५०६७१	२२६००७	३०१३४२	४५२०१३	७५३३५५
६	९६	६५५९६	१३९१९३	२०८७८९	२७८३८६	४१७५७९	६९५९६५

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

अ.क्र.	मुदती ठेवीचे विवरण		लागू व्याजदर	पतसंस्था व इतर संस्था
१	१५ दिवस ते ९० दिवस		६.००%	६.००%
२	९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता)		६.५०%	५.००%
३	१८१ दिवस ते १३ महिने		६.००%	६.००%
४	१४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
५	आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
६	मासिक ठेव		७.००%	-
७	बचत ठेव	अ) रू. ३ लाखांपर्यंत	३.००%	-
		ब) रू. ३ लाखांचे वर	४.५०%	-

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

वय	गुंतवणूक रक्कम	मिळणारी रक्कम
जन्माच्या वेळी	१७०००	१०३६०९
१ वर्ष	१८०००	१००६५७
२ वर्ष	१९५००	१०००५२
३ वर्ष	२१५००	१०१२१७
४ वर्ष	२३५००	१०१५०९
५ वर्ष	२५५००	१०१०६४
६ वर्ष	२७५००	१००००३
७ वर्ष	३००००	१०००९७
८ वर्ष	३३०००	१०१०२७
९ वर्ष	३६०००	१०११२२
१० वर्ष	३९०००	१००५१५

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

भर पावसातही शेतकऱ्यांच्या बांधावर जावुन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली नुकसानीची पाहणी....

दिवाळी पुर्वी शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्याची दिली ग्वाही ..तर प्रशासनाला दिले तात्काळ पंचनाम्याचे करण्याचे निर्देश ..

जनसंचलन/ बुलढाणा

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बाधित क्षेत्राची पाहणी आज केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी पाऊस सुरू असतानाही शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली. नुकसानीचे पंचनामे त्वरित करून शासनाला सादर करा असे निर्देश प्रशासनाला दिले तर दिवाळीपूर्वी नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे असा विश्वासही त्यांनी शेतकऱ्यांना दिला. आज २७ सप्टेंबर रोजी सिंदखेडराजा तालुक्यातील वर्दडी फाटा,बोराखडी गंडे,चांगेफळ देवखेड रुम्हणा शिवारात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाचा दौरा केंद्रीय आयुष आरोग्य कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला. आज सकाळपासूनच या परिसरामध्ये पाऊस सुरू असतानाही त्यांनी अंगात रेनकोट घालून ते शेतकऱ्यांच्या बांधावर गेले. नुकसानीची पाहणी केली व प्रशासनाला तात्काळ पंचनाम्ये करण्याचे निर्देश दिलेत. आणि शेतकरी बांधवांशी संवाद साधला. आलेल्या नैसर्गिक संकटाला आपण सर्वच सामोरे जावु, सरकार तुमच्या पाठीशी आहे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळावी यादृष्टीकोणातून शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगुण दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसानीची

भरपाई त्यांच्या खात्यात जमा होईल अशी ग्वाही त्यांनी शेतकऱ्यांना दिली. यावेळी माजी आमदार डॉ.शंशिकांत खेडेकर, माजी आमदार तोताराम कायंदे यांच्यासह शिवसेना, युवासेना महायुतीचे पदाधिकारी, महसूल,कृषी,गटविकास अधिकारी अन्य विविध विभागाचे अधिकारी,शेतकरी बांधव उपस्थित होते.

सीसीटीएनएस प्रणाली मानांकनात बुलढाणा जिल्हा पोलीस दल राज्यात चौथ्या स्थानी!

पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांचे मार्गदर्शनात उत्कृष्ट कामगीरी!

जनसंचलन/बुलढाणा

सीसीटीएनएस प्रणाली मानांकनात बुलढाणा जिल्हा पोलीस दल राज्यात चौथ्या क्रमांकावर आहे. सीसीटीएनएस हा राष्ट्रीय पातळीवरील प्रकल्प असुन एन. सी. आर. बी. नवी दिल्ली कडून सर्व राज्यांमध्ये राबविण्यात येतो. सदर प्रकल्पाअंतर्गत बुलढाणा जिल्हयाचे ३४ पोलीस स्टेशन संगणकीकृत असून संपूर्ण कामकाज ऑनलाईन सुरु असून माहे जाने २०२५ पासून प्रणालीतील फॉर्म फिडींग करण्यातही १० पैकी १० गुण मिळवुन कामकाजात राज्यस्तरावर बुलडाणा जिल्हा पोलीस दल पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांचे मार्गदर्शनात उत्कृष्ट कामगीरी बजावत आहे.

सीसीटीएनएस प्रणाली माहे जुन २०२५ चे मानांकन नुकतेच जाहीर झाले असून बुलढाणा जिल्हा पोलीस दल राज्यस्तरावरील मानांकनात ०४ था क्रमांकावर आहे. सदरची उत्कृष्ट कामगीरी ही पोलीस अधिक्षक सो. श्री निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक तथा सिसिटीएनएस प्रणालीचे नोडल अधिकारी श्री अमोल गायकवाड, सीसीटीएनएस प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरिक्षक सचिन पाटील सोबत पोहेका सुनिल वाघमारे, पोका किरण चिंचोले, मपोहेका दिपामाला पुरंदरे, कविता पाडळे, प्रतिभा इंगळे, नगमा शेख, नापोका संतोष कायंदे, मपोहेका दिपाली खर्चे यांनी बजावली आहे. तसेच पोलीस अधीक्षक श्री निलेश तांबे यांनी अप्पर पोलीस अधीक्षक तथा नोडल अधिकारी सीसीटीएनएस बुलढाणा यांना यापेक्षाही अधिक चांगली कामगिरी करून राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी निर्देश दिले आहे

सहकार विद्या मंदिर डोणगावचा आट्यापाट्या संघ जिल्ह्यातून दुसरा उल्लेखनीय कामगिरीची परंपरा कायम.....

जनसंचलन/ डोणगाव

बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी द्वारा संचालित. डोणगाव येथील इंदिराबाई माधव सावजी सहकार विद्या मंदिर डोणगाव च्या मुलींच्या चमूने आट्यापाट्या खेळ प्रकारात जिल्ह्यातून दुसरा क्रमांक पटकावला.

महाराष्ट्र शासनाच्या क्रिडा व युवक कल्याण विभागामार्फत घेण्यात आलेल्या,शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उल्लेखनीय कामगिरीची परंपरा कायम राखत. दिन २४ सप्टेंबर रोजी. शेगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहकार च्या मुलींच्या संघाने जिल्ह्यातून दुसरा क्रमांक मिळवला. यामध्ये मानवी देशमुख, चैताली पळसकर, आदिती वानखेडे, अनुश्री खंडारे, प्रणाली पळसकर, श्रावणी साबळे, अनुष्का सुर्वे, राधिका अंभोरे, कृष्णाली वानखेडे, तनुष्का बाजड, वैष्णवी झनक, प्राची गोळे या मुलींचा सहभाग होता. मैदानी स्पर्धांमध्ये तालुका स्तरावर १४ वर्षे वयोगटातील.मुलींच्या रिले स्पर्धेत प्रणाली पळसकर, चैताली पळसकर, श्रावणी साबळे, अनुश्री खंडारे, आदिती वानखेडे, यांच्या चमूने प्रथम क्रमांक मिळवला. वैयक्तिक खेळांच्या स्पर्धेत हेतल खवाल थाळीफेक मध्ये द्वितीय, चैताली पळसकर १०० मीटर मध्ये प्रथम, लांब उडी प्रथम. आदिती वानखेडे थाळीफेक मध्ये प्रथम. प्रणाली पळसकर. अडथळ्यांच्या शर्यतीत पहिली आली. १७ वर्षाखालील वयोगटात वेदिका जाधव अडथळ्याच्या शर्यतीत द्वितीय. साक्षी मोरे प्रथम. वेदिका नवले तीन किलोमीटर वाकिंग मध्ये प्रथम क्रमांक. स्वरांजली आंबेकर द्वितीय क्रमांक. १९ वर्षाखालील वयोगटात. अक्षरा भुसारे ट्रिपल जम्प मध्ये प्रथम. मुलांच्या १४ वर्षे खालील वयोगटात. अंशुमन गावंडे १०० मीटर द्वितीय. लांब उडी मध्ये द्वितीय. चंदन बाजड २०० मीटर मध्ये द्वितीय. श्रीपाद सुर्वे हर्डल मध्ये द्वितीय, १७ वर्षां खालील वयोगटात कार्तिक देशमुख पाच किलोमीटर वाकिंग मध्ये द्वितीय क्रमांक, सार्थक दांदडे तिसरा क्रमांक. आशिष राठोड १०० मीटर रनिंग द्वितीय. ट्रिपल जंप. द्वितीय क्रमांक, यानिमित्त, बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी चे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा, कोमल झंवर तसेच शाळेचे मुख्याध्यापक सुनील गाढे, क्रीडा शिक्षक सातपुते, नारायण खोडके, विनय खोडके, उल्का सिरसाट. व शिक्षकांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२७७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८